जा.क्र.कृतंमाकें/रसामो/दरपत्रक/१९६/२०
कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र
डॉ. बा.सा.को.कृ.वि. दापोली
दिनांक १६/१०/२०२०

प्रति,
_______________
_______________
_______________
_______________

**विषय** :—रक्षक सापळयाचा मोल्ड (साचा) तयार करण्यासाठी दरपत्रक पुरविणेबाबत....

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, विस्तार शिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत असलेल्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र कार्यालयास खाली नमूद केल्याप्रमाणे रक्षक सापळयाचा मोल्ड (साचा) खरेदी करावयाचा आहे.

| अ.क्र | तपशिल | मोल्डचा प्रकार | परिमाण |
|---|---|---|---|
| १ | प्लास्टिक जार २ mm जाडी | P 20/OHNS | प्रत्येकी १ नग |
| २ | जार कॅप | P 20 | |
| ३ | थ्रेडेड प्लास्टिक पाईप | P 20 | |
| ४ | थ्रेडेड प्लास्टिक प्लेट | P 20 | |
| ५ | राऊंड डबी विथ कॅप | P20 | |

**अटी व शर्ती** :—

१. बंद लखोटयातील दरपत्रके दि.२/११/२०२०पर्यंत व्यवस्थापक, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि. दापोली, जि. रत्नागिरी, पिन ४१५७१२ या कार्यालयात पोहोच होणे आवश्यक आहे.
२. बंद लखोटयावर 'रक्षक सापळा मोल्ड तयार करण्यासाठीचे दरपत्रक' असे स्पष्ट नमूद करावे.
३. विहित मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.३/११/२०२० रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील.
४. टपाल खात्याच्या विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
५. दरपत्रके पुरवठाधारकाने जीएसटी क्रमांक नमूद करावा.
६. जीएसटी क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधीकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेले पुरवठाधारकाचे लेटरहेड वरील दरपत्रक आवश्यक, सोबत पॅनकार्ड प्रत जोडणे आवश्यक आहे.
७. अधिकृत विक्रेता अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे तसेच संबधित कंपनीची अधिकृत दरसुची सोबत जोडावी.
८. दरपत्रकात संबधित सर्व करांचा उल्लेख असणे आवश्यक आहे.
९. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरुस्त करण्याचा/नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

१०. मोल्ड तयार करण्याची ऑर्डर दिल्याच्या तारखेपासून मोल्डचा पुरवठा ६० दिवसात कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली येथे कार्यालयीन वेळेत केला पाहिजे.

११. रक्षक सापळा हे विद्यापीठाचे तंत्रज्ञान असल्याने सदर सापळयाची प्रतिकृती/मोल्ड पुरवठादाराने विद्यापीठाव्यतिरिक्त अन्य कोणालाही विक्री/पुरवठा करु नये.

१२. नमूना रक्षक सापळा व त्याची आकृती विद्यापीठाच्या कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्रामध्ये तसेच विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर पाहता येईल.

संचालक
विस्तार शिक्षण
डॉ.बा.सा.को.कृ.वि.दापोली

प्रत:—

१. व्यवस्थापक, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ. बा. सा. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, सदरच्या जाहिरातीस विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.

२. विद्यापीठातील सर्व सूचना फलक

# फळमाशी रक्षक सापळा (Rakshak Trap)



